(34)

Order SR185-86 Monje kolivli

...१...

क्र.महसूल/कक्ष-१/टे.७/एनएपी/एसआर-१८५/०६
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दिनांक 24 APR 2007

वाचले :-

१. श्री सुरेशकुमार नरसिंगरावर पिंपळे स्वतः व इतर यांचे कु.मु. रा. कोलीवली, चितपार्क, दुसरा मजला, नाशिक रोड, कल्याण (प), जि. ठाणे यांचा दि. १०/११/२००६ रोजीचा अर्ज.

२. तहसिलदार कल्याण यांचेकडील चौकशी अहवाल क्र. जमिनबाब/टे.२/कावि-६०७८/एसआर-१८१/०६, दि. ०२/१/२००७, २) पत्र क्र. जमिनबाब/टे.२/कावि-६०७७/एसआर-१८१, दि. ०२/१/२००७

३. कल्याण महानगर पालिका यांचेकडील बांधकाम परवानगी जा.क्र. कडोंमपा/नरवि/बांप/कावि /४१३-१८४ दि. २९/९/२००६

४. उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी उल्हास नगर नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र.युएलसी/युएलएन/६(१)/एसआर-९२/कोलीवली, दि. १७/१२/२००४

५. सामान्यशाखा (भूसंपादन विभाग) यांचेकडील पत्र क्र. सामान्य/का-४/टे-३/भूस/एसआर-९३२/०६ दिनांक ११/१२/२००६

६. दैनिक 'महाराष्ट्र जनमुद्रा' या वृत्तपत्रांमध्ये दि. १७/११/२००६ रोजी प्रसिध्द केलेला जाहिरनामा.

७. अर्जदार यांनी सादर केलेले दिनांक ६/११/२००६ रोजीचे हमीपत्र.

---

आदेश :-

ज्या अर्थी श्री सुरेशकुमार नरसिंगरावर पिंपळे स्वतः व इतर यांचे कु.मु. रा. कोलीवली, चितपार्क, दुसरा मजला, नाशिक रोड, कल्याण (प), जि. ठाणे यांनी ठाणे जिल्हयातील कल्याण तालुक्यातील मौजे – कोलीवली येथील स. नं. ४१ पै ७/२ प्रमाणे क्षेत्र ४४६८.२४ चौ.मी. तसेच प्लॉट क्र ३८ प्रमाणे क्षेत्र ७९८.०० चौ.मी प्रत्यक्ष सर्वे प्रमाणे क्षेत्र ७८५-०० चौ.मी. एवढया जागेचा रहिवास या बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याची परवानगी मिळण्याबाबत अर्ज केलेला आहे.

आणि ज्या अर्थी अर्जदार यांनी दि. १७/११/२००६ रोजी दैनिक 'महाराष्ट्र जनमुद्रा' या वृत्तपत्रात जाहिरात दिलेली होती व त्यावर विहीत मुदतीत कोणतीही हरकत या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

त्या अर्थी आता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे निहित करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन जिल्हाधिकारी याद्वारे १) श्री डी. जी. पिंपळे, २) श्री सि के पिंपळे, ३) श्री रमेशकुमार नरसिंगरावर पिंपळे, ४) श्री सुरेशकुमार नरसिंगरावर पिंपळे, ५) श्री मोहनराव नरसिंगराव पिंपळे, ६) श्री कृष्णा नरसिंगराव पिंपळे, ७) श्रीमती सरस्वतीबाई नरसिंगरावर पिंपळे यांना तालुका कल्याण मधील मौजे- कोलीवली येथील सोबतचे परिशिष्ट मध्ये नमूद केलेल्या स. नं. ४१ पै ७/२ प्रमाणे क्षेत्र ४४६८.२४ चौ.मी. तसेच प्लॉट क्र ३८ प्रमाणे क्षेत्र ७९८.०० चौ.मी प्रत्यक्ष सर्वे प्रमाणे क्षेत्र ७८५-०० चौ.मी. या क्षेत्रास रहिवास या बिगरशेतकी प्रयाजनार्थ पुढील शर्तीवर परवानगी देणेत येत आहे.

बदल क्र. ९८६८ | २०१२
३६ | ६०

त्या शर्ती अशा:-

१. ही परवानगी अधिनियम त्याखालील केलेले नियम यांना अधिन ठेवून देण्यांत आलेली आहे.